दै. देशोन्नती दि. 05/01/2023

# ग्रामीण पोलिसांनी ६५६ गुन्ह्यापैकी ४८९ गुन्हे केले उघड - सपोनि जगताप

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत गतवर्षीच्या तुलनेत खुनाच्या घटनेत घट झाली असून मागील वर्षी १३ खुनाच्या तुलनेत यावर्षी दाखल असलेल्या १० गुन्हे पैकी ९ गुन्हे उघडकीस आणुन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जवळपास ७८९ समाजकंटकासह गुन्हेगारांवर कार्यवाही करुन प्रतिबंधात्मक कार्यवाही केली. यामध्ये एकुण दाखल झालेल्या ६५६ गुन्हा पैकी ४८९ गुन्हे उघडकीस आणल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी दिली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशानुसार व उपविभागीय पोलिस अधिकारी सुशिलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप व संबंधित पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी तपासातील गुन्ह्यात गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी सन २०२३ मध्ये एकुण गुन्हे जवळपास ६५६ दाखल करण्यात आले असून त्यापैकी ४८९ गुन्हे उघडकीस आणले आहेत. कलम ३०२ नुसार १० गुन्हे दाखल असुन ९ उघड झाले आहेत तर खूनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी १५ पैकी १५ गुन्हे उघड केले आहेत. तर अत्याचार प्रकरणात दाखल झालेले १६ पैकी १६ गुन्हे उघडकीस आणले. दरोडा गुन्ह्यातही ७पैकी ७ गुन्हे उघड केले. जबरी चोरीमध्ये दाखल २१ पैकी १७ उघड झाले आहेत, घरफोडीतील दाखल २७ पैकी २ उघड, सर्व चोरी गुन्ह्यात १७३ दाखल पैकी ५१ उघड, दंगा प्रकरणात दाखल १३ पैकी १३ उघड करण्यात आले , कलम ४२० मध्ये दाखल ४ पैकी ४ उघड, पळवून



नेणे ३६३ कलमा मध्ये २० दाखल १४ उघड, घराविषयी आगळीक दाखल ७ ७ उघड, दुखापत १६२ दाखल १६० उघड, सरकारी नोकरावर हल्ला प्रकरणात दाखल ९ पैकी ९ उघड, विनयभंग दाखल १८ पैकी १८ उघड, अपघात मृत्यू ३२ दाखल ३० उघड, ४९८ हुंडाबळी प्रकरणात दाखल ५० पैकी ५० गुन्हे उघड झाले आहेत. एकुण दाखल गुन्हे ६५६ असुन त्यापैकी ४८९ उघड झाले आहेत. एकुण प्रतिबंधात्मक कार्यवाहीमध्ये गतवर्षी ६२७ जणांवर कार्यवाही करण्यात आली आहे. यावर्षी ७८९ जणांवर कार्यवाही करण्यात आली आहे.

# नायलॉन मांजा विक्रेत्यांवर पोलिसांची करडी नजर

**नांदेड** – मानवी व प्राणि जिवितास अपायकारक असलेला नायलॉन प्लास्टीक सींथेटीक धाग्यापासून बनविलेला मांजा खरेदी-विक्री करणारे, साठा करणारे दुकानदार यांच्यावर पोलिसांची करडी नजर राहणार आहे. असा जीवघेणा मांजा आढळून आल्यास मांजा विक्रेते व साठेबाजी करणाऱ्या दुकानदारांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

नायलॉन मांजा विकेत्यांवर नजर ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी जिल्ह्यातील सर्वच्या सर्व ३६ पोलीस ठाण्यात विशेष पथक स्थापन केले आहे. स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय (मो.नं. ८३७८८०३००४ ) हे या विशेष पथकांचे प्रमुख आहेत.

या पथकाच्या माध्यमातून मानवी व प्राणी जिवितास अपायकारक असलेला नायलॉन / सिंथेटीक प्लास्टीक धाग्यापासून बनवलेला मांजा खरेदी/विक्री करणारे, साठा करणारे दुकानदार, त्यांची निर्मीती अथवा पुरवठा करणारे इसमांवर करडी नजर ठेवण्यात येणार आहे. नॉयलॉन मांजा विकणाऱ्याची माहिती असल्यास पोलीस नियंत्रण कक्षास, ११२ या क्रमांक किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नांव गोपनीय ठेवण्यात येणार आहे. मकर संक्रात सणानिमित्त नायलॉन मांजाजी विक्री, पुरवठा, वाहतूक करु नये, अन्यथा संबंधीत दुकानदार व पुरवठादारांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे, असा इशाराही पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिला आहे.